N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस निरीक्षक सत्यमेव जयते जिल्हापेठ पो.स्टे.जळगाव

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** जिल्हापेठ **Year (वर्ष):** 2021

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0446 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 13/10/2021 21:59 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From** (दिनांक पासून): 13/10/2021

**Date To** ( दिनांक पर्यंत): 13/10/2021

**Time From** (वेळेपासून): 15:07 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 15:07 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date** (दिनांक ): 13/10/2021 **Time** (वेळ): 21:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No.** (नोंद क्र.): 049 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 13/10/2021 21:40 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 01 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

**(b) Address** (पत्ता): पोलीस अधिक्षक कार्यालय,येथील महिला सहाय्य कक्षात ,जळगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name** (नाव): सुनिल भगवान परदेशी

**(b) Father's Name** (वडील चे नाव) : भगवान परदेशी

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रायपुर कुंसूबा पोचिंचोली, जळगाव,जिल्हापेठ ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रायपुर कुंसूबा पोचिंचोली, जळगाव,जिल्हापेठ ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-7066737879**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिलिंद साडु केदार | | वडील का नाम : साडु केदार | 1. 3 कषी कलणी प्लाट -15,3नवसाचा गणपति मंदिराजवळ बजरंग,3 पुला जवळ जळगाव ,जिल्हापेठ ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/ रु त्यात 500 रू दराच्या 40नोटा | 20,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 20,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

1)पोलीस स्टेशन ,गुरनं व कलम जिल्हापेठ पोस्टे जळगाव गुरन 446 /2021 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम सन 1988 कलम7प्रमाणे 2)मुळ तक्रारदार व फिर्यादीचे नांव:- सुनिल भगवान परदेशी वय-30 धंदा -मजुरी रा. रायपुर कुंसूबा पो.चिंचोली ता.जि जळगाव3) आरोपीचे नांव पत्ता -मिलिंद साडु केदार .वय -54 सहाय्यक पो.उप निरीक्षक नेम- स्थानिक गुन्हे शाखा महिला सहाय कक्ष. पोलिस अधिक्षक कार्यालय जळगाव.रा- कृषी कलणी प्लाट -15 नवसाचा गणपति मंदिरा जवळ बजरंग पुला जवळ जळगाव जि- जळगाव.(खाते पोलिस- वर्ग 3)4) गुन्हा घडला ता.वेळ.व ठिकाण-- दि13/10/2001 रोजी 15.07वा.पोलीस अधिक्षक कार्यालय जळगाव येथील महिला सहाय्य कक्षात . 5) गुन्हा दाखल ता.व.वेळ दि 13/10/2021रोजी वा6) आरोपी अटक ता. व. वेळ 13/10/21 रोजी वा. 7) लाचेची मागणी रक्कम 20,000/- रु 8)हस्तगत लाचेची रक्कम 20,000/- रु त्यात 500 रू दराच्या 40नोटा9) सापळा व तपास अधिकारी - श्री संजोग के.बच्छाव. पोलीस निरीक्षक , अँन्टी करप्शन ब्युरो. जळगाव 10) गुन्हयाची थोडक्यात हकीकत यातील यातील फिर्यादी व त्याचे विरूध्दच्या तक्रार अर्जाचे चौकशी अहवाला मधे फिर्यादी यांचे विरूध्दचा दुसऱ्या लग्नाच्या आरोपाचा मुद्दा अहवालात नमुद न करण्यासाठी व फिर्यादी यांनी त्यांचे पत्नीस जे 4 लाख रू.रोख दिले आहे त्याचा घटस्फोट करार नामा अहवाला सोबत पाठविण्यासाठी तसेच फिर्यादी व त्याचे कुटुंबिया विरूध्द कलम 498 च्या गुन्ह्यात मदत करण्याच्या मोबदल्यात आरोपी यांनी फिर्यादी यांचे कडेस 25.000रू ची लाचेची मागणी केली त्या बाबत फिर्यादी यांनी दि 13/10/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव कार्यालयात समक्ष तक्रार दिली होती
सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव पथकाने दि.13/10/2021रोजी पळताळणी केली असता यातील आरोपी यांनी वर नमुद कामाच्या मोबदल्यात फिर्यादी यांचे कडेस प्रथम 25.000रू.व तडजोडी अंती 20000रू लाच मागणी करून सदर लाच रक्कम आरोपी यांनी वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी स्वता: स्विकारली म्हणुन गुन्हा. सोबत संगणीकृत केलेली फिर्याद या सोबत जोडलेली आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): VILAS VASANT SHENDE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)
**Name** (नाव): VILAS VASANT SHENDE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

फिर्याद

जिल्हापेठ पोलीस स्टेशन जळगांव
दिनांक १३.१०.२०२१

**मी सुनिल भगवान परदेशी, वय ३० वर्षे, व्यवसाय मजुरी, रा.रायपुर कुसुंबा पोस्ट चिंचोली ता.जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझी आई, भाऊ व वहिणी यांचेसह राहतो व मी मोलमजुरीचे काम करून उदरनिर्वाह करतो.

माझा विवाह सन २०१६ साली काजल भरत परदेशी रा. अहमदाबाद मुळ रा. कंडारी ता.जि.जळगांव हिचेशी झाला आहे. तिचे पासुन मला ०३ वर्षाची मुलगी आहे. मागील चार वर्षापासुन माझे व माझे पत्नीचे कौटुंबिक वाद होवुन नेहमी भांडणतंटा होत असल्यामुळे आमचे आप—आपसात पटत नसल्यामुळे माझी पत्नी ही सुमारे ०४ वर्षापासुन माझे मुलीसह तिचे माहेरी राहावयास गेली आहे. त्याबाबत आमचे चौकशी प्रकरण व न्यायालयीन प्रकरण चालु आहे.

माझी पत्नी सौ.काजल हिने माझे विरुध्द तसेच माझी आई सौ.रेखाबाई भगवान परदेशी, भाऊ विजय भगवान परदेशी, वहीणी सौ.सिमा विजय परदेशी व बहीण सौ.आशा प्रविण परदेशी यांच्या विरुध्द महिला सहाय्य कक्ष पोलीस अधिक्षक कार्यालय,जळगांव येथे तक्रारी अर्ज दिला आहे.

माझे पत्नीचे व माझे ०४ वर्षापासुन जमत नसल्याने वेळावेळी माझे नातेवाईकांमार्फत व न्यायालयामार्फत समन्वय साधण्याचा प्रयत्न केला होता. परंतु माझे पत्नीस माझे सोबत नांदावयाचे नसल्याने ती माझे सोबत येण्यास तयार नव्हती. त्यामुळे दि.०५.०४.२०२१ रोजी मी तिच्या घरच्यांशी बैठक घेवुन मला घटस्फोट देवुन टाक असे सांगितले. त्यावर त्यांनी मला ०४ लाख रुपये देवुन टाका, त्यानंतर आम्ही तुम्हाला घटस्फोट देवुन टाकु असे सांगितल्याने आम्ही १०० रुपयांचे स्टॅम्प पेपरवर दोघांच्या संमतीने करारनामा करुन पत्नी सौ.काजल हिला ०४ लाख रुपये रोख दिले. तरी देखील पत्नी सौ.काजल हीने माझे व माझे कुंटूबियाचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज दिला आहे.

सदर अर्जावरुन मला व माझे घरच्यांचे नावे एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या मार्फतीने दि.०३.०८.२०२१ रोजी लेखी पत्र देवुन आम्हास दि.०८.०९.२०२१ रोजी चौकशीसाठी महिला सहाय्य कक्ष पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव येथे हजर राहण्याची समज देण्यात आली होती.

त्यानुसार मी दि.११.०९.२०२१ रोजी माझा चुलत भाऊ मनोज परदेशी यांचे सह सदर चौकशी साठी हजर राहीलो. त्यावेळी सदर कार्यालयात आमचे प्रकरणाशी संबंधीत चौकशी करणारे पोलीस कर्मचारी मिलींद केदार हे आम्हास भेटले. त्यावेळी त्यांनी माझी चौकशी करुन मला पुढील दि.१२.१०.२०२१ रोजी चौकशी साठी हजर राहण्याची तारीख दिली होती.

त्यानुसार मी दि.१२.१०.२०२१ रोजी महिला सहाय्य कक्ष पोलीस अधिक्षक कार्यालय,जळगांव येथे जावुन पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांना भेटलो. त्यावेळी माझी पत्नी सौ.काजल ही देखील चौकशीसाठी आली होती. आमच्या दोघांचे सदर प्रकरणांत जाब जबाब घेतले. त्यानंतर पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांनी मला सांगितले की, तुझे पत्नीने तक्रार अर्जामध्ये तु दुसरे लग्न करणार आहे असे नमुद केले आहे. तु तुझे पत्नीस ०४ लाख रुपये रोख दिले असा घटस्फोट करारनामा केला आहे. तो खोटा व बनावट आहे. असे तुझे पत्नीने मला सांगितले आहे. सदर प्रकरणांत तुझेवर व तुझे कुंटूबियांवर कलम ४९८ प्रमाणे गुन्हा दाखल होणार आहे असे सांगुन तु जर मला २५,०००/—रु. आणुन दिले तर तुझे पत्नीने तु दुसरे लग्न करणार आहे, असा तो मुद्दा टाकला आहे तो मी अहवालात नमुद करणार नाही. तसेच तु तुझे पत्नीस ०४ लाख रुपये रोख दिले असा जो करारनामा केला आहे तो मी अहवाला सोबत पाठवुन देईल त्यामुळे तुझेवर होणा—या केसमध्ये त्याचा तुला फायदा होईल तसेच मी तुझा अहवाल पोलीस स्टेशनला पाठवत नाही तो पर्यन्त तुझेवर कलम ४९८ चा गुन्हा दाखल होणार नाही असे सांगितले.

तेव्हा मी पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांना माझे जवळ सध्या पैसे नाहीत, मी माझा चुलत भाऊ मनोज परदेशी यांना सदरची बाब सांगुन त्यांना घेवुन दि.१३.१०.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजे पर्यन्त आपणास भेटण्यासाठी येतो असे सांगुन निघुन आलो आहे. बाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात जावुन पोलीस निरीक्षक श्री.एस.के.बच्छाव यांचे कडे तक्रार दिली. तेव्हा बच्छाव साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले त्यानंतर बच्छाव साहेब यांनी दोन्ही पंचाचा सापळा पथकाचा, माझा व भाऊ मनोज परदेशी अशांचा आपआपसात परीचय करून दिला. त्यानंतर माझी तक्रार संगणकावर तयार करुन घेतली.

त्यानंतर मी बच्छाव साहेब यांना कळविले की, मी पोलीस अधिक्षक कार्यालयातील महिला सहाय्य कक्ष येथे जातांना सोबत माझा भाऊ मनोज परदेशी यास सोबत घेवुन जाणार असल्याचे कळविले. त्यास बच्छाव साहेब यांनी संमती दिली. त्यावेळी बच्छाव साहेब यांनी मला, पंच क्रं.१ व मनोज परदेशी अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला,माझा भाऊ मनोज परदेशी व पंच क्रं.१ अशांना पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांची भेट घेण्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालयातील महिला सहाय्य कक्ष येथे माझे व माझा भाऊ मनोज परदेशी यांचे मोटार सायकलवर पाठविले होते. तेव्हा मी, माझा भाऊ मनोज परदेशी व पंच क्र.०१ असे पोलीस अधिक्षक कार्यालयातील महिला

सहाय्य कक्ष येथे गेलो. तेव्हा सदर ठिकाणी पोलीस कर्मचारी मिलींद केदार हे दिसुन न आल्याने मी माझे मोबाईल फोनवरून पोलीस कर्मचारी, मिलींद केदार यांचे मोबाईल फोनवर फोन लावला तेव्हा त्यांनी दहा मिनीटात येतो असे सांगितले. त्यामुळे आम्ही त्यांची वाट पाहत सदर ठिकाणी थांबुन होतो. त्यानंतर काही वेळाने पोलीस कर्मचारी मिलींद केदार हे सदर कार्यालयात आले. त्यानंतर पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांच्याशी मी व माझा भाऊ मनोज परदेशी यांनी माझे व माझे कुटुंबियाविरूध्द असलेल्या तक्रारी अर्जाबाबत चर्चा केली. तेव्हा पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांनी माझेकडेस प्रथम २५,०००/— रुपये व तडजोडीअंती २०,०००/—रुपये लाच मागणी केली. तेव्हा माझा भाऊ मनोज परदेशी यांनी पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांना आम्ही एक दिड तासात येतो असे सांगितले. त्यानंतर आम्ही सदर कार्यालयातुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे, माझा भाऊ मनोज परदेशी व पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांचे मधील झालेले संभाषण दोन्ही पंचानी व बच्छाव साहेब यांनी ऐकले. तेव्हा बच्छाव साहेब व दोन्ही पंच यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने त्यांनी लागलीच पुढील सापळा कार्यवाही सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली २०,०००/—रू. रक्कम (त्यात ५००/—रू.दराच्या ४० नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केले. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला, माझा भाऊ मनोज परदेशी व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, माझा भाऊ मनोज परदेशी व पंच क्रं.१ अशांना पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांना भेटण्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालय जळगांव येथिल महिला सहाय्य कक्ष येथे पाठविले होते.तेव्हा बच्छाव साहेब यांनी सदर कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा मी, माझा भाऊ मनोज परदेशी व पंच क्रं. १ असे पोलीस अधिक्षक कार्यालय जळगांव येथील महिला सहाय्य कक्ष येथे गेलो. तेव्हा पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांनी मला उजव्या हाताचा पहीला बोट व अंगठयाने पैशांचा इशारा केला व आणले आहेत का? असे विचारले तेव्हा मी पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांना वीस हजार रूपये आणले आहेत असे सांगुन माझे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिशात असलेले २०,०००/—रुपये (त्यात ५००/— रुपये दराच्या ४० नोटा) लाच रक्कम माझे उजव्या हाताने बाहेर काढुन सदरची रक्कम पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांचे समोर धरली असता पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांनी सदर लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारली. तेव्हा मी त्यांना मोजुन घ्या असे सांगितले असता त्यांनी काही न बोलता सदर लाच रक्कम त्यांचे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी पोलीस कर्मचारी मिलींद केदार यास रंगेहाथ पकडले. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पोलीस कर्मचारी मिलींद केदार यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव मिलींद सांडु केदार, वय ५४, व्यवसाय नोकरी सहाय्यक फौजदार ब.नं.३५, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, महिला सहाय्य कक्ष, पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव रा.कृषी कॉलनी, प्लॉट नं. १५, नवसाचा गणपती मंदीराजवळ, बजरंग पुलाजवळ, जळगांव जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये पोलीस कर्मचारी मिलींद केदार, माझे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी मिलींद सांडु केदार, सहाय्यक फौजदार, स्थानिक गुन्हे शाखा, महिला सहाय्य कक्ष, पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव यांनी दि.१३.१०.२०२१ रोजी पंचासमक्ष माझे विरूध्दचे तक्रार अर्जाचे अहवालामध्ये माझ्या दुस—या लग्नाचा मुद्दा अहवालात नमुद न करण्यासाठी तसेच मी माझे पत्नीस जे चार लाख रूपये रोख दिले आहे त्याचा घटस्फोट करारनामा अहवालासोबत पाठविण्यासाठी व कलम ४९८ च्या गुन्हयात मदत करण्याची सबब सांगुन माझे कडेस तडजोडीअंती २०,०००/—रु. लाच मागणी केली व सदर लाच रक्कम आरोपी मिलींद सांडु केदार यांनी दि.१३.१०.२०२१ रोजी दुपारी ०३.०७ वा. पोलीस अधिक्षक कार्यालय जळगांव येथिल महिला सहाय्य कक्षात स्वत: स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी मिलींद सांडु केदार यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्यादीची सही

सुनिल भगवान परदेशी